प्रकरण दुसरे

# संशोधनाशी संबंधित साहित्याचा आढावा

# प्रकरण दुसरे

# संशोधना संबंधित साहित्याचा आढावा

2.0 प्रस्तावना

2.1 पूर्वी झालेल्या संशोधनांचा आढावा.

2.2 प्रस्तुत संशोधनाचे वेगळेपण.

# प्रकरण दुसरे

# संशोधना संबंधित साहित्याचा आढावा

## 2.0 प्रास्ताविक :-

मागील प्रकरणात समस्येच्या संदर्भातील काही संकल्पना, शालेय अनुभव कार्यक्रमाची माहिती, शिक्षक प्रशिक्षणाची ऐतिहासिक पार्श्वभूमी, समस्या विधान, समस्या स्पष्टीकरण, समस्या संशोधनाचे महत्व, समस्येची व्याप्ती व मर्यादा, संशोधनाची गृहितके, उद्दिष्ट्ये, परिकल्पना इ. बाबींचा अंतर्भाव केलेला आहे.

या प्रकरणात प्रस्तुत संशोधन समस्येच्या संदर्भात पूर्वी कोणत्या स्वरूपाचे संशोधन कार्य झालेले आहे याचा आढावा घेतलेला आहे. यामुळे संशोधन समस्येची व्याप्ती निश्चित करणे, संशोधनाची उद्दिष्टे ठरविणे, न्यादर्श निवडणे, संशोधनाची साधने निश्चित करणे, कार्यपध्दती ठरविणे, या बाबी सुलभ झाल्या. कोणत्याही समस्येला अनेक मिती असतात. संशोधकांनी समस्येच्या या अनेक बाजूवर प्रकाश पाडून व त्या त्या संदर्भातील उकली शोधून एकूण समस्येची सोडवणूक करणे आवश्यक असते.

गुड, बार आणि स्केटस् यांच्या मते, "The competent physician must keep abreast of the latest discoveries in the field of medicine, obviously the careful student of education, the research worker and investigator should become familiar with the location and use of sources of educational information."

किंबहुना "First find out everything, everybody has done and then begin where they left off." असा एडिसनचा संशोधन करण्याविषयीचा नियम होता.

पूर्वी झालेल्या संशोधनाचा आढावा घेताना शिक्षकाच्या क्षमता, सराव पाठ, नवोपक्रम व शालेय अनुभव कार्यक्रमाशी संबंधित झालेल्या संशोधनाचा आढावा घेतला आहे.

1. **देव, डी. एस., (1985), ''द स्टडी द प्रॅक्टीकल प्रोग्राम ऑदर दॅन प्रॅक्टीस टीचिंग इन टीचर एज्युकेशन इन्स्टिट्यूट - पीएच्. डी. 1985, पान क्रं.931**

**संशोधनाची उद्दिष्टे :-**

1. माध्यमिक शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रमातील प्रात्यक्षिक कामातील विद्यार्थ्यांची भूमिका अभ्यासणे.
2. प्रात्यक्षिक कामासाठी परिणामकारक सूचना सूचविणे.
3. प्रात्यक्षिक काम कशा पध्दतीने राबवितात याचा अभ्यास करणे इ.

**संशोधनाची कार्यपद्धती :-**

या संशोधनाच्या अभ्यासासाठी दिल्ली येथील तीन शिक्षक प्रशिक्षण संस्थामधून 350 प्रशिक्षणार्थी व 55 प्राध्यापकांची यादृच्छिक पद्धतीने नमुना निवड केली आहे.

**संशोधनासाठी वापरलेली साधने :-**

1. प्राध्यापकांसाठी प्रश्नावली.
2. प्राध्यापकांसाठी निरीक्षण तक्ता.

**निष्कर्ष :-**

1. शिक्षक प्रशिक्षणाची उद्दिष्टे व प्रात्यक्षिके पूर्ण करण्यासाठी कमी वेळ मिळतो.
2. प्रशिक्षण पूर्ण करण्यासाठी प्रशिक्षणार्थींना आवश्यक ती दृक-श्राव्य साधने पुरवली जात नाहीत.
3. प्रशिक्षण कालावधीमध्ये महाविद्यालयात प्रशिक्षणार्थीसाठी सहलीचे आयोजन केले जात नाही.
4. सदरच्या महाविद्यालयात समाजसेवा हा प्रशिक्षणाचा महत्वाचा भाग मानला जात नाही.
5. प्रशिक्षणार्थीची गरज आणि आवड पाहून सहशालेय उपक्रमांचे आयोजन केले जात नाही.

2. **मोहंती एस. बी. (1984) अ स्टडी ऑफ स्टुडंट टीचिंग प्रोग्राम इन कॉलेज ऑफ एज्युकेशन वुईथ स्पेशन रेफरन्स टू इनोव्हेशनस - पीएच्. डी. 1990**

**संशोधनाची उद्दिष्टे :-**

1. शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील अध्यापन कार्यक्रमाची उद्दिष्टे व प्रक्रियेचा तसेच सराव अध्यापन, पर्यवेक्षक, मूल्यमापन, सहकार्य भावना व नवोपक्रम यांचा अभ्यास करणे.
2. अध्यापन कार्यक्रमाचा नवोपक्रम कार्यक्रम संबंधित अभ्यास करणे.

**संशोधनाची कार्यपद्धती :-**

सदरच्या अभ्यासासाठी ओरिसा राज्यातील 19 शिक्षक प्रशिक्षण महाविद्यालयातील जनसंख्येचा समावेश केला आहे. तसेच संबंधित महाविद्यालयातील प्राचार्य व अधिव्याख्यातांचा समावेश केला आहे.

**संशोधनासाठी वापरलेली साधने :-**

1. प्रश्नावली.
2. निरीक्षण तक्ता.
3. मुलाखत.

**निष्कर्ष :-**

1. सर्व महाविद्यालयामध्ये प्रशिक्षण तंत्र, निरीक्षण, वर्गशिस्त संघटन कार्य आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले जात होते.
2. अध्यापन करत असताना अनेक अध्यापन पद्धतीचा वापर केला जात नव्हता.
3. सराव पाठ कार्यक्रमात पाठ घेण्यावर भर होता परंतु प्रशिक्षणार्थींमध्ये इतर कृती कार्यक्रम घेण्याची वृत्ती दिसून आली नाही.
4. मूल्यमापनाच्या निकषांमध्ये वस्तुनिष्ठपणा दिसून आला नाही.
5. सरावपाठ शाळा व महाविद्यालयातील संबंध हे अतिशय सर्वसाधारण दिसून आले.

3. **वझे, एम. ए. (1976) - इफेक्टस ऑफ मॉडलिंग अॅन्ड मायक्रोटिचींग ऑन द अॅक्युशन ऑन सरटन स्किल्स इन कशनिंग .**

**उद्दिष्टे :-**

1. प्रश्न विचारणे या कौशल्यांतर्गत (प्रत्याभरण, केंद्रोपगामी व केंद्रोपसारी प्रकारचे प्रश्न) विविध प्रकारचे आदर्श नमुने तयार करणे.
2. दिग्दर्शीत आदर्शीकरण व सूक्ष्म अध्यापनाचा प्रश्न विचारणे, कौशल्यावर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करणे.
3. वर्ग अध्यापनातील प्राविण्यावर प्रश्न विचारणे, या कौशल्याच्या प्रशिक्षणाचा परिणाम अजमावणे.

**कार्यपध्दती :-**

संशोधनाचे नियोजन हे तीन टप्प्यात करण्यात आले. पहिल्या टप्प्यात बडोदा येथील शिक्षणशास्त्र विभागातील बी.एड. च्या वर्गातील 18 शिक्षकांची निवड पथदर्शी अभ्यासाकरीता केली. दुसऱ्या टप्प्यात रत्नागिरी येथील शासकीय शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील 30 विद्यार्थी शिक्षकांची निवड केली. या तीस विद्यार्थ्यांची हिंदी, भूगोल व विज्ञान अध्यापन पध्दतीनुसार प्रत्येकी चार विद्यार्थी अशी तीन गटांत विभागणी केली. तिसऱ्या टप्प्यात 30 विद्यार्थी दुसऱ्या बॅचची निवड केली. त्यापैकी इंग्रजी व मराठी अध्यापन पध्दती असणारे 20 विद्यार्थी होते.

**संशोधनासाठी वापरलेली साधने :-**

1. निरीक्षकांसाठी पाठ निरीक्षण तक्ता.
2. सूक्ष्म अध्यापनासाठी तक्ता.
3. अध्यापन कौशल्ये मूल्यमापन तक्ता - प्रत्याभरण प्रश्नासाठी.
4. अध्यापन कौशल्ये मूल्यमापन तक्ता - केंद्रोपगामी प्रश्न.
5. विद्यार्थी शिक्षक संपादन पदनिश्चयन श्रेणी.
6. सूक्ष्म अध्यापन स्वयंमूल्यमापन श्रेणी.

**निष्कर्ष :-**

1. वर्षारंभी प्रत्याभरणासाठी प्रश्न विचारणे कौशल्य संपादन करण्यासाठी सूक्ष्म अध्यापन तंत्र फार उपयुक्त आढळले. सांकेतिक आदर्शीकरण मात्रा व श्राव्य आदर्शीकरण मात्रा यामध्ये लक्षणीय बदल आढळले नाहीत.

2. सांकेतिक आदर्शीकरणात श्राव्य आदर्शीकरणाची जोड दिल्याने प्रत्याभरणासाठी प्रश्न हे कौशल्य संपादन करण्यासाठी परिणामकारक ठरते. सूक्ष्म अध्यापन तंत्र मात्र तितकेसे उपयुक्त ठरत नाही.

3. भाषिक गटात केंद्रोपगामी प्रश्न विचारणे कौशल्य संपादन करण्यासाठी श्राव्य आदर्शीकृत व सांकेतिक आदर्शीकरणाची जोड सूक्ष्म अध्यापनास दिल्यास परिणामकारकरित्या हे कौशल्य संपादन केले जाते.

**4. योगेंद्रकुमार आणि रतनलाल (1980) - युज ऑफ मायक्रोटीचिंग इन इम्प्रोव्हिंग जनरल टीचिंग कॉम्पेटंसिज ऑफ इनसर्व्हिस टीचरस्.**

**उद्दिष्टे :-**

1. सूक्ष्म अध्यापनाची सेवेत असणाऱ्या शिक्षकांच्या सर्वसाधारण अध्यापन क्षमतेच्या सुधारणेमधील परिणामकारकता अभ्यासणे.
2. सेवेत असणाऱ्या शिक्षकांमध्ये प्रश्न विचारणे, प्रबलन, चेतक बदल, उदाहरणासह स्पष्टीकरण, शैक्षणिक साधनांसह स्पष्टीकरण, विद्यार्थ्यांचा वाढता सहभाग या कौशल्याच्या विकासामधील सूक्ष्म अध्यापनाची परिणामकारकता अभ्यासणे.
3. सेवेत असणाऱ्या शिक्षकांचे स्वयंमूल्यमापन व विद्यार्थ्यांकरवी होणारे मूल्यमापन यामधील सूक्ष्म अध्यापनाची परिणामकारकता अभ्यासणे.

**कार्यपध्दती :-**

गुरगाव या उपविभागातील माध्यमिक शाळांमध्ये सेवेत असणाऱ्या 20 शिक्षकांचा न्यादर्शात समावेश करण्यात आला होता. दोन श्रेणी असलेली 'अध्यापन मूल्यमापन शोधिका' तसेच विद्यार्थ्यांची शिक्षकांविषयी मते अजमावण्यासाठीची शोधिका अशा दोन संशोधन साधनांचा संशोधनासाठी वापर

करण्यात आला होता. संशोधनासाठी एकल गट पूर्व चाचणी - अंतिम चाचणी अभिकल्पांचा स्वीकार करण्यात आला होता आणि गृहितकृत्याच्या पडताळणीसाठी T परीक्षिकाचा वापर करण्यात आला होता. तसेच शिक्षकांचे स्वयंमूल्यमापन आणि निरीक्षकांचे मूल्यमापन यातील सहसंबंधाचे मापन करण्यात आले होते.

**निष्कर्ष :-**

1. सूक्ष्म अध्यापनाचे प्रशिक्षण दिल्यानंतर प्रश्न विचारणे, प्रबलन, चेतक बदल, उदाहरणासह स्पष्टीकरण, शैक्षणिक साधनासह स्पष्टीकरण, विद्यार्थ्यांचा पाठात वाढता सहभाग यासंबंधीच्या अध्यापन क्षमता व कौशल्ये याबाबत शिक्षकांत सुधारणा झाली.
2. स्वत:च्या क्षमतांचे मूल्यमापन, अध्यापन फायदे, स्वसंपादन व आत्मस्वीकृती याबाबत सूक्ष्म अध्यापनाची शिक्षकांना मदत होते.
3. सूक्ष्म अध्यापनाचा सराव दिल्यानंतर विद्यार्थ्यांकडून होणाऱ्या शिक्षकांच्या मूल्यमापनात थोडासा बदल दिसून आला.
4. जास्त अध्यापन अनुभव शिक्षकांपेक्षा कमी अध्यापन असलेले तरूण शिक्षकांना बदल अध्यापन कार्यक्रमाचा अधिक फायदा झाल्याचे दिसून आले.
5. सेवेतील शिक्षकांसाठी मोठ्या प्रमाणात सूक्ष्म अध्यापन कार्यक्रम राबविला गेला तर शिक्षकांची सर्वसाधारण अध्यापन क्षमता सुधारू शकते असे दिसते.

**5. जांगिरा, एन. के., मात्यू बी. के., सिंग ए. (1980) - युज ऑफ मायक्रोटीचिंग फॉर इम्प्रुव्हींग जनरल टीचिंग कॉम्पीलस ऑफ इन नर्व्हिस टीचर.**

**उद्दिष्टे :-**

1. इ. 7 वी ला अध्यापन करणाऱ्या सेवेत असणाऱ्या शिक्षकांच्या उच्चार कौशल्य, प्रबलीकरण, चेतक बदल, उदाहरणाद्वारे स्पष्टीकरण, वर्ग अध्यापनात विद्यार्थ्यांचा वाढता सहभाग या कौशल्यामध्ये होणाऱ्या सुधारणांवर सूक्ष्म अध्यापन तंत्राचा शिक्षकांवर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करणे.
2. प्रशिक्षणाचा शिक्षकांच्या सामान्य अध्यापन कौशल्यावर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करणे.

**कार्यपध्दती :-**

दिल्ली प्रशासकीय कार्यक्षेत्रातील माध्यमिक शाळांतील प्राचार्याशी चर्चा करून इयत्ता सातवीला सामाजिक अभ्यासाचे अध्यापन करणाऱ्या 19 शिक्षकांची निवड केली. अभ्यासात पूर्व चाचणी, उत्तर चाचणी, एकल गट पध्दतीचा वापर केला. पहिल्या उत्तर चाचणीनंतर आठ आठवड्यांनी प्रशिक्षणोत्तर निरीक्षणाद्वारे कौशल्ये व अध्यापन क्षमतेतील प्राप्ती टिकवणूकचा अभ्यास केला. शिक्षकाची अध्ययन क्षमता आणि कौशल्य क्षमता मापनासाठी बरोडा जनरल कॉम्पटिन्स स्केलचा वापर केला. पूर्व चाचणी, उत्तर चाचणी 1 आणि उत्तरचाचणी 2 अशा तीन वेळी प्रत्येक शिक्षकाच्या दोन पाठांचे दोन निरीक्षकांनी निरीक्षण केले. दोन निरीक्षकांपैकी एक एन.सी.ई.आर.टी. आणि दुसरा एन.आय.ई. दिल्लीचा होता.

**निष्कर्ष :-**

1. सूक्ष्म अध्यापन वापराच्या प्रशिक्षणानंतर अभ्यासासाठी निवडलेल्या सामाजिक अभ्यासाच्या एकोणीस शिक्षकांच्या प्रबलीकरण, चेतक बदल, सोदाहरण स्पष्टीकरण, विद्यार्थ्यांचा वाढता सहभाग या कौशल्याचा वापराच्या क्षमतेच्या गुणांकामध्ये लक्षणीय वाढ आढळली.
2. सूक्ष्म अध्यापन वापराच्या प्रशिक्षणानंतर शिक्षकांच्या सामान्य अध्यापनाच्या क्षमतेमध्ये लक्षणीय वाढ आढळून आली.
3. प्रशिक्षणानंतर आठ आठवड्यांनी शिक्षकांनी कौशल्ये तसेच अध्यापन क्षमतांवर प्रभुत्व मिळविले.
4. एका शिक्षकांशिवाय उरलेल्या सर्व शिक्षकांमध्ये व्यक्तीगत सूक्ष्म अध्यापन कौशल्य व सर्वसामान्य अध्यापन याबाबतीत सुधारणा आढळली.

6. **बाबा, एम. एन. - इफेक्टिव्हनेस ऑफ मायक्रो टीचिंग वुईथ प्लॅनड इंटिग्रेशन ट्रेनिंग समेटीव्ह मॉडेल अॅन्ड मायक्रो टीचिंग विदाऊट प्लॅनड इंट्रिगेशन ट्रेनिंग ऑन द जनरल टीचिंग कॉपेटन्सिज ऑफ टीचर ट्रेनिंग.**

**उद्दिष्टे :-**

1. सहभागी विद्यार्थी शिक्षकांच्या शिकविण्याच्या कार्यक्षमतेवर सूक्ष्म अध्यापन प्रशिक्षणाने अपेक्षित बदल झाला की नाही हे तपासणे.
2. सूक्ष्म अध्यापनाशी समतुल्य असा काही अधिक नियोजनबद्ध सुचनात्मक प्रशिक्षणाने विद्यार्थी शिक्षकांच्या अध्यापन कार्यक्षमतेमध्ये किती बदल झाला ते शोधणे.
3. सूक्ष्म अध्यापनानंतर जे विद्यार्थी शिक्षक एकात्मिकरणावर आधारित मार्गदर्शनात सहभागी झाले होते. त्यांना अध्यापन कौशल्याचे एकात्मिकरण यामध्ये झालेला बदल अभ्यासणे.
4. कोणत्याही अधिक नियोजन बद्ध, सूचनांशिवाय सूक्ष्म अध्यापन तंत्राचा विद्यार्थी शिक्षकांना अध्यापन कार्यक्षमतेसाठी झालेला फायदा अभ्यासणे.

**कार्यपध्दती :-**

प्रायोगिक पध्दतीचा वापर केला. यादृच्छिक न्यादर्शनाने विद्यार्थी शिक्षकांची निवड केली व 20 विद्यार्थी शिक्षकांचे दोन गट तयार केले. त्यामध्ये एक प्रायोगिक गट व दुसरा नियंत्रित गट तयार केला.

**निष्कर्ष :-**

1. प्रायोगिक गटातील सर्व सहभागी शिक्षकांचा अध्यापन कार्यक्षमतेमध्ये सूक्ष्म अध्यापन पध्दतीमध्ये सुधारणा घडवून आली हे समजले.
2. एकात्मिकतेवर आधारित मार्गदर्शनामुळे विद्यार्थी शिक्षकांना अध्यापन कौशल्याचे एकात्मिकरण करण्याची क्षमता विकसित करण्यासाठी मदत झाली हे माहिती झाले.
3. विद्यार्थी शिक्षकांनी सूक्ष्म अध्यापन परीक्षणानंतर स्वत:च्या ज्ञानावर अध्यापन केल्यामुळे त्यांची अध्यापन कार्यक्षमता वाढण्यास मदत झाली.

7. **कल्याणपूरकर एस. - द फेक्ट ऑफ मायक्रोटीचिंग ऑन द टीचिंग कॉम्पेटन्सीज ऑफ इनसर्व्हिस टीचर ॲन्ड इटस् इंपॅक्ट ऑन पुपील्स अटेनमेंट ॲन पुपील्स लायकींग - पीएच्. डी. 1988.**

**उद्दिष्टे :-**

1. सूक्ष्म अध्यापनाचा निवड कौशल्याच्या विकासासाठी उपयोग यात प्रश्न विचारणे, प्रबलन देणे, स्पष्टीकरण - सोदाहरण आणि चेतक बदल यांचा समावेश होतो.
2. सेवाकालीन शिक्षकांच्या कार्यक्षमतेवर होणारा सूक्ष्म अध्यापनाच्या प्रशिक्षणाच्या विधायक प्रभावाचा अभ्यास करणे.
3. सेवाकालीन शिक्षकांच्या कार्यक्षमतेत होणारा सूक्ष्म अध्यापनाच्या प्रशिक्षणाच्या विधायक प्रभावाचा अभ्यास करणे.

**कार्यपध्दती :-**

नमुना म्हणून उदाहरणासाठी 17 शाळेमधून 720 विद्यार्थी आणि 36 शिक्षक घेतले. यासाठी जे शिक्षक घेतले त्यांना सामान्य विज्ञान हा विषय मराठी माध्यमाच्या आणि 7 वी च्या वर्गाला शिकविण्याचा कमीत कमी दोन वर्षाचा अनुभव आहे.

**निष्कर्ष :-**

1. सूक्ष्म अध्यापनाचा अपेक्षित परिणाम पुढील कौशल्याचा विकासास दिसून आला. PQ, RE, EK & SK आणि जेव्हा चाचणी घेण्यात आली तेव्हा प्रायोगिक गटाचे गुण हे नियंत्रीत गटापेक्षा विरूध्द म्हणजेच चांगले जास्त होते.
2. सूक्ष्म अध्यापनामुळे शिक्षकांच्या साधारण शिकविण्याच्या कार्यक्षमतेवर चांगलाच विकास दिसून आला आणि अध्यापनाच्या चाचणीत प्रायोगिक गट आणि नियंत्रीत गट यांचे गुण विरूध्द दिसून आले. म्हणजेच प्रायोगिक गटाचा विकास झालेला आढळून आला.

**8. राज मिनाक्षी पी. के. - फॅक्टर्स अफेक्टींग टीचिंग कॉम्पेटन्सी ऑफ बी. एड. ट्रेनिज इन टीचिंग फिजिकल सायन्स - पीएच. डी. 1988.**

**उद्दिष्टे :-**

1. विद्यार्थी शिक्षकांच्या अध्यापन विषयक कार्यक्षमतेवर अडसर असणारे घटक ओळखणे.
2. योग्य साधनांच्या आधारे विद्यार्थी शिक्षकांच्या अध्यापन विषयक कार्यक्षमतांचा अभ्यास करणे.

**कार्यपध्दती :-**

वरील अहवाल तामिळनाडू मधील अध्यापक महाविद्यालयातील 610 विद्यार्थ्यांची निवड केली होती. त्यासाठी मुख्य विषय शारीरिक शिक्षण होता आणि त्यामध्ये 1500 शाळांतील मुलांचा सहभाग होता.

**निष्कर्ष :-**

1. विद्यार्थ्यांच्या मूल्यमापनाचा संचयसाठा उच्च गुण (80-95), स्वत:चे मूल्यमापन गुण 50-85 आणि प्राध्यापकांचे गुणांक हे 45-65 च्या दरम्यान होते. यात बी. एड. च्या विद्यार्थ्यांचाही समावेश होता.
2. संबंधित संशोधनात असे दिसून आले की, दिग्दर्शीत आणि सूक्ष्म अध्यापनाने शिकविण्याच्या कार्यक्षमतेमध्ये विकास होतो.
3. व्यवस्थापनाचा प्रकार बी. एड. साठी विद्यार्थ्यांची (प्रवेशासाठी) गर्दी तसेच प्राध्यापक आणि विद्यार्थी शिक्षक यांच्यातील दुषित संबंध हे विद्यार्थी शिक्षकाच्या अध्यापन विषयक कार्यक्षमतेमधील तामिळनाडूमधील महाविद्यालयामध्ये महत्वाचे अडसर आहेत.

**प्रस्तुत संशोधनाचे वेगळेपण :-**

वरील सर्व संबंधित साहित्याचा अभ्यास केला तर आपल्याला असे जाणवेल की शालेय अनुभव कार्यक्रमाशी संबंधित संशोधनाचा अभाव जाणवतो. कारण शालेय अनुभव कार्यक्रम राबवित असताना फक्त अध्यापनावर भर असत नाही तर शिक्षकाच्या अंगी आवश्यक त्या क्षमतांचा विकास व्हावा हा त्यामध्ये उद्देश असतोच. पण अध्यापनाबरोबर शाळेत इतर अनेक कामे करावी लागतात. त्यांचा अनुभव या कालावधीमध्ये विद्यार्थी शिक्षकांस मिळतो.

वरील संशोधन हे सूक्ष्म अध्यापन, सरासपाठ, नवोपक्रम इ. प्रात्यक्षिकांशी संबधित आहेत. परंतु सदरचे संशोधन हे बी. एड्. अभ्यासक्रमामध्ये राबविले जाणारे महत्वाचे प्रात्यक्षिक शालेय अनुभव कार्यक्रम / छात्र सेवा काल याच्याशी संबंधित आहे. प्रशिक्षणार्थी भावी शिक्षक म्हणून त्यांच्या अंगी सर्व क्षमता विकसित होणे अपेक्षित आहे. शालेय अनुभव कार्यक्रमामध्ये अध्यापन व अभ्यासपूरक उपक्रम राबविले जातात म्हणून त्याचा प्रशिक्षणार्थींच्या क्षमतांवर परिणाम होतो.

सदरचे संशोधन हे प्रशिक्षणार्थीच्या क्षमतांशी निगडीत आहे. शालेय अनुभव कार्यक्रमांचा प्रशिक्षणार्थींच्या क्षमतांवर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास केला आहे. अशा प्रकारे संबंधित संशोधन प्रशिक्षणार्थींच्या क्षमतांवर भर देणारे आहे.